# महाराष्ट्र शासन

E-mail: deskf10.rfd-mh@gov.in

क्र.एफएलडी-१३२३/प्र.क्र.१२४/फ-१०
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक:- २१ एप्रिल, २०२३

प्रति,

अपर मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, नागपूर

**विषय:- वनजमिन - रायगड**
**राष्ट्रीय महामार्ग-१६६डी, पेण-खोपोली-महाड (कि.मी. ००+००० ते कि.मी. ३३ + ३२८), या रस्त्याच्या कामासाठी रायगड जिल्ह्यातील ९.९२४९ हे. वनजमीन वळतेकरणेबाबत...**

**संदर्भ:-** केंद्रस्थ अधिकारी यांचे पत्र क्र. कक्ष-१७/नोडल/ठाणे/ID-१३७२७ (NH) / १७५२ /२२-२३, दि. १३.०३.२०२३

संदर्भाधीन दिनांक-१३.०३.२०२३ रोजीच्या पत्रान्वये राष्ट्रीय महामार्ग-१६६डी, पेण-खोपोली-महाड (कि.मी. ००+००० ते कि.मी. ३३ + ३२८), या रस्त्याच्या कामासाठी रायगड जिल्ह्यातील ९.९२४९ हे. वनजमीन वळतेकरणेबाबत प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे.

२. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने खाली नमूद मुद्यांची माहिती आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायांसह शासनास तात्काळ उपलब्ध करुन द्यावी.

१) उपवनसंरक्षक, अलिबाग यांनी ऑनलाईन पार्ट-२ मध्ये अ.क्र. २ येथे वळतीकरणासाठी प्रस्तावित जमिन ९.८८५५ आणि अ.क्र. ३ व ४ येथे ९.४२४९ असे नमूद केले आहे. सबब, त्यामध्ये ९.९२४९ अशी सुधारणा करून ऑनलाईन पार्ट-२ सादर करावा.

२) प्रस्तावित जमिनीच्या बहुतांश ७/१२ उताऱ्यावर खाजगी व्यक्तींची नावे आहेत. तसेच ७/१२ उताऱ्यावर भोगवटादार वर्ग-२, कुळ कायद्याने प्राप्त जमिन, हेटवणे प्रकल्पाकडे जाणाऱ्या रस्त्यासाठी व कालव्यासाठी भूसंपादन कलम-४ अन्वये संपादित जमिन, वन अधिनियम कलम ३५ मधून मुक्त, बाळगंगा नदी प्रकल्पासाठी संपादित, संरक्षित कुळ, पेण-खोपोली रस्ता रुंदीकरणासाठी संपादित क्षेत्र अशा प्रकारच्या नोंदी आहेत. मौजे पिंपळगाव आणि गागोदे बुद्रुक येथील खाजगी वनजमिन चौकशीवर प्रलंबीत असा शेरा लिहून, वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत वळतीकरणासाठी प्रस्तावित केली आहे. सदर जमिन वनजमिन असल्याचा कोणताही उल्लेख ७/१२ उताऱ्यावर दिसून येत नाही. त्यामुळे सदर जमिनीला वन

(संवर्धन) अधिनियम, १९८० च्या तरतुदी लागू होतात किंवा कसे, याबाबत पुनश्च: तपासणी करून, माहिती सादर करावी.

३) प्रकल्प यंत्रणेने खाजगी हक्क धारकांचे ना-हरकत प्रमाणपत्र सादर करावे.

४) वळतीकरणासाठी प्रस्तावित केलेल्या मौजे पिंपळगाव, गट नं. २७/२, ३०, मौजे कामार्ली, सर्व्हे नं. ४४pt., आणि गागोदे खुर्द, गट नं. ८, १३२, १४१बी येथील तसेच पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित केलेल्या मौजे. शिहू, ता. रोहा, कक्ष नं. २०९ येथील क्षेत्राचे अधिकार अभिलेख सादर करावेत.

(गणेश जाधव)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन